**ठळक बातम्या**

- जनगणनेच्या पहिल्या टप्प्यासाठी केंद्र सरकारकडून अधिसूचना जारी

- सरकारी नोकरीचं आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या टोळीवर ईडीचे छापे

- प्रसिद्ध साहित्यिक ज्ञानरंजन यांचं मध्यप्रदेशात जबलपूरमध्ये निधन

- ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ, पद्मभूषण डॉ. माधव गाडगीळ यांचं निधन

आणि

- जगभरातल्या ६० हून अधिक संस्थांच्या सदस्यत्वातून अमेरिकेची माघार

**<><><><><>**

केंद्र सरकारनं जनगणनेच्या पहिल्या टप्प्यासाठी अधिसूचना जारी केली आहे. या वर्षी १ एप्रिल ते ३० सप्टेंबर या कालावधीत देशातली सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये घरांची गणना करण्यात येईल. त्या आधीचे १५ दिवस नागरिकांना स्वतःहून या घरांच्या गणनेची माहिती देता येईल. दुसऱ्या टप्प्यात फेब्रुवारी २०२७ मध्ये लोकसंख्येची गणना होईल. मोबाइल ॲपद्वारे केली जाणारी ही देशातील पहिली जनगणना असेल.

**<><><><><>**

ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयाने देशभरात सरकारी नोकरीचं आमिष दाखवणाऱ्या एका टोळीचा शोध सुरू केला असून, सहा राज्यांमधल्या १३ शहरांमध्ये जवळपास १५ ठिकाणांवर छापे टाकले. बिहार, पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू, गुजरात आणि उत्तर प्रदेशात हे छापे टाकण्यात आले.

ही टोळी बनावट ईमेल खात्यांचा वापर करून तसंच अधिकृत सरकारी डोमेनची हुबेहूब नक्कल करून नोकरीचं बनावट पत्र पाठवत होती. यावर विश्वास बसावा यासाठी काही जणांना सुरुवातीचे दोन ते तीन महिने पगारही देण्यात आल्याचं ईडीने म्हटलं आहे. आधी हा घोटाळा भारतीय रेल्वे विभागाच्या नावानं सुरू असल्याचं उघडकीला आलं होतं. मात्र, त्यानंतर वनविभाग, टपाल, प्राप्तिकर, उच्च न्यायालय, सार्वजनिक बांधकाम विभाग

यांच्यासह ४०पेक्षा जास्त सरकारी संस्था आणि विभागांच्या नावानं हा घोटाळा सुरू असल्याचं ईडीला आपल्या तपासात आढळून आलं.

<><><><><>

आय पॅक या राजकीय सल्लागार संस्थेचे प्रमुख प्रतीक जैन यांच्या कोलकाता इथल्या निवासस्थानी ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयाने आज छापा टाकला. काही वर्षांपूर्वीच्या कोळसा तस्करी प्रकरणी ही कारवाई केल्याचं ईडीने सांगितलं. प्रतीक जैन यांच्या निवासस्थानाची आणि कार्यालयाची झडती ईडीचे अधिकारी घेत आहेत. दरम्यान पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि कोलकाता पोलीस आयुक्त मनोज वर्मा हे प्रतीक जैन यांच्या निवासस्थानी पोहोचले, प्रतीक जैन हे तृणमूल काँग्रेसचे कार्यकर्ते असून जैन यांच्या घरातून उमेदवार यादीसारखी कागदपत्रं ईडी जप्त करत असल्याचा आरोप बॅनर्जी यांनी केला. त्यानंतर बॅनर्जी आय पॅकच्या कार्यालयातही गेल्या. ममता बॅनर्जी ईडीच्या कामात अडथळे आणत असून त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी विरोधी पक्षनेते सुवेंदु अधिकारी यांनी केली आहे.

<><><><><>

सोमनाथ स्वाभिमान पर्वाच्या प्रारंभानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सर्व देशवासियांना शुभेच्छा दिल्या. देशाच्या सुपुत्रांनी कधीही आपली तत्वं आणि निती यांच्याशी तडजोड केली नाही, याचं स्मरण करणारा हा दिवस असल्याचं प्रधानमंत्री समाजमाध्यमावरल्या पोस्टमधे म्हणाले. जानेवारी १०२६ ला सोमनाथवर पहिला हल्ला झाला. वारंवार हल्ले होऊनही भक्तांच्या श्रद्धेच्या जोरावर सोमनाथ मंदिराची पुनर्बांधणी होत राहिली, असं ते म्हणाले.

<><><><><>

प्रसिद्ध साहित्यिक ज्ञानरंजन यांचं काल मध्यप्रदेशामधल्या जबलपूर इथं निधन झालं. ते ९० वर्षांचे होते. काल सकाळी प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं, मात्र उपचारादरम्यान रात्री त्यांची प्राणज्योत मालवली.

महाराष्ट्रातल्या अकोला इथं २१ नोव्हेंबर १९३६ ला ज्ञानरंजन यांचा जन्म झाला. शिक्षण आणि नोकरीनिमित्त महाराष्ट्र, राजस्थान, दिल्ली, मध्यप्रदेश आणि उत्तरप्रदेशात त्यांनी आपलं जीवन व्यतित केलं. ज्ञानरंजन यांचे अनेक कथासंग्रह प्रसिद्ध असून

‘कबाडखाना’ या त्यांच्या पुस्तकामुळे त्यांना विशेष ओळख मिळाली. त्याचप्रमाणे ‘पहल’ या मासिकाचं संपादन त्यांनी अनेक वर्षं केलं. साहित्य भूषण, मध्यप्रदेशाच्या साहित्य परिषदेचा पुरस्कार, शिखर पुरस्कारासह ते अनेक पुरस्कारांचे मानकरी आहेत. जबलपूर इथं त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**<><><><>**

ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांचं काल रात्री पुण्यात दीर्घ आजारानं निधन झालं. ते ८३ वर्षांचे होते. भारताच्या पर्यावरण विषयक संशोधन आणि संवर्धन धोरणाला आकार देण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. आपल्या सहा दशकांपेक्षा जास्त वैज्ञानिक कारकिर्दीत, पर्यावरणाबाबत जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. त्यांच्याविषयी अधिक जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून…

- **- - होल्ड व्हाइस कास्ट - -**

*(माधव गाडगीळ यांनी पुण्यातल्या फर्ग्युसन महाविद्यालयात जीवशास्त्र या विषयात पदवी मिळवली. त्यानंतर मुंबई विद्यापीठातून प्राणीशास्त्रात पदव्युत्तर पदवी, आणि १९६९ साली हार्वर्ड विद्यापीठातून पीएचडी केली. हार्वर्ड मध्ये त्यांनी गणितीय पर्यावरणशास्त्र आणि प्राण्यांच्या वर्तनावर काम केलं. भारतात परतल्यावर ते बंगळुरू इथल्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स’ या संस्थेत रुजू झाले. संस्थेच्या पर्यावरण विज्ञान केंद्राचे ते संस्थापक होते. निवृत्ती नंतर ते पुण्यातली आघारकर संशोधन संस्था आणि गोवा विद्यापीठातल्या शैक्षणिक उपक्रमांमध्ये सहभागी झाले.*

*गाडगीळ यांनी पंतप्रधानांची वैज्ञानिक सल्लागार परिषद, राष्ट्रीय सल्लागार परिषद आणि राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणासह अनेक उच्चस्तरीय राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये काम केलं.*

*पश्चिम घाटातली जैवविधता जपण्यासाठी आणि त्याचं संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी डॉ.माधव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखालच्या तज्ञ समितीने तयार केलेला ‘गाडगीळ अहवाल’ महत्वाचा ठरला.*

*जागतिक जैवविविधतेचं आकर्षण केंद्र असलेल्या पश्चिम घाटावरच्या त्यांच्या मोलाच्या कामगिरीबद्दल, २०२४ मध्ये, संयुक्त राष्ट्रांनी गाडगीळ यांना ‘चॅम्पियन्स ऑफ द अर्थ’ या पुरस्कारानं सन्मानित केलं होतं. संयुक्त राष्ट्रांचा पर्यावरण क्षेत्रासाठीचा हा सर्वोच्च*

*सन्मान आहे. गाडगीळ यांनी 'धिस फिशर्ड लँड' आणि 'इकॉलॉजी अँड इक्विटी' यासारख्या प्रभावी पुस्तकांचं लेखन आणि सह-लेखन केलं. त्यांचे २५० पेक्षा जास्त शोध-निबंध प्रकाशित झाले आहेत. डॉ. माधव गाडगीळ यांना भारत सरकारने १९८१ मध्ये पद्मश्री आणि २००६ मध्ये पद्मभूषण पुरस्कारानं सन्मानित केलं होतं. तसंच शांती स्वरूप भटनागर पुरस्कार, व्होल्वो पर्यावरण पुरस्कार आणि पर्यावरण क्षेत्रातल्या कामगिरीसाठी टायलर पुरस्कार यासारख्या अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आलं होतं.)*

**<><><><><>**

राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी माधव गाडगीळ यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी त्यांच्या श्रीलंका दौऱ्याच्या पहिल्या दिवशी राजकीय आणि लष्करी अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय बैठक घेतली. भारत आणि श्रीलंका यांच्यातले द्विपक्षीय संबंध, प्रादेशिक सुरक्षा, लष्करी देवाणघेवाण आणि श्रीलंकेच्या लष्कराला समर्थन देण्याबाबत यावेळी चर्चा झाली.

**<><><><><>**

जगभरातल्या ६० हून अधिक संघटनांमधलं अमेरिकेचं सदस्यत्व अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रद्द केलं आहे. या संस्था कालबाह्य आणि अमेरिकेच्या हिताविरुद्ध असल्याचा ट्रम्प यांचा दावा आहे. यापैकी ३१ संस्था संयुक्त राष्ट्रांच्या आणि ३५ इतर संस्था आहेत. यामध्ये **Intergovernmental Panel on Climate Change, UN Department of Economic and Social Affairs, UN Population Fund,** इंटरनॅशनल सोलर अलायन्सचा यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

अमेरिकेसोबतचे आपले संबंध बिघडले असून इतर देशांशी व्यापारी संबंध सुरू ठेवणार असल्याचं व्हेनेझुएलाच्या अंतरिम अध्यक्ष डेल्सी रॉड्रीग्ज यांनी म्हटलं आहे. सरकारी वाहिनीवरुन त्या देशवासियांना संबोधित करत होत्या. व्हेनेझुएलाच्या निर्यातीपैकी

७१ टक्के निर्यात ही ८ देशांना होते. त्यातली २५ टक्के अमेरिकेत होत असल्याचं त्या म्हणाल्या.

<><><><><>

बांगलादेशाची राजधानी ढाका इथं काल रात्री बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीशी संबंधित संघटनेच्या एका नेत्याची हत्या झाली. अजिजूर रहमान मुसाबीर असं या नेत्याचं नाव आहे. मुसाबीर हे बीएनपीशी संलग्नित स्वेच्छासेबोक दल या संघटनेचे पदाधिकारी होते. कारवान बाजार व्हॅन मालक संघटनेचे पदाधिकारी अबु सुफियान या हल्ल्यात जखमी झाले आहेत. या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी ढाक्यामधल्या फाउंटन चौकात निदर्शनं केली.

<><><><><>

नेपाळचे ऊर्जा आणि जलसंपदा मंत्री कुलमन घिसिंग यांनी काल आपल्या पदाचा राजीनामा दिला. प्रधानमंत्री सुशिला कार्की यांच्याकडे राजीनामा सुपूर्द केल्यावर घिसिंग यांनी पत्रकार परिषद घेऊन यापुढचा आपला राजकीय प्रवास सुरूच राहील असं स्पष्ट केलं.

<><><><><>

प्रक्रीया केलेले अन्नपदार्थ किंवा शीतपेयांचं सेवन केल्यानं कर्करोगाचा धोका वाढतो असा संशोधन अहवाल ब्रिटीश मेडिकल जर्नलमध्ये प्रसिद्ध झाला आहे. potassium sorbate, potassium metabisulfite, sodium nitrite, potassium nitrate, acetic acid यासारख्या अन्नपदार्थांना दीर्घकाळ टिकवून ठेवणाऱ्या रसायनांमुळं कर्करोगाचा धोका वाढतो, असं यात म्हटलंय.

<><><><><>

ऑस्ट्रेलियानं ॲशेस ही क्रिकेट मालिका ४-१ नं जिंकली आहे. गुरुवारी झालेल्या अखेरच्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं इंग्लंडवर ५ गड्यांनी विजय मिळवला. दुसऱ्या डावात अखेरच्या दिवशी इंग्लंडचा संघ ३४२ धावा काढून सर्वबाद झाला. विजयासाठी ऑस्ट्रेलियाकडे १६० धावांचं आव्हान होतं. ते त्यांनी ५ गडी गमावून साध्य केलं.

//<><><><><>//